जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०१०/२०२३
## दि.०६/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३७४/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५० वर्षे,सिक्युरिटी गार्ड,रा.बोपोडी,पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/१०/२०२३ रोजी रात्री ०३/१५ वा.आयोध्या नगरी को.ऑप.हौ.सोसायटी,भाऊ पाटील रोड,बोपोडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आयोध्या नगरी को.ऑप.हौ.सोसायटी येथे सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरीस आहेत. यातील नमुद इसमांनी सोसायटीचे गेट मधुन चार इसम सोसायटीचे आत येत असताना,फिर्यादी यांनी त्यांना अडविले असता,त्यांनी फिर्यादी यांना तु कौन है रे पुछनेवाला असे बोलून,त्यांना धक्का-बुक्की करून,त्यांचे तोंड दाबुन,त्यांचे पॅन्टचे खिशातील २,१००/- रूपये रोख रक्कम जबरदस्तीने काढुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वैभव मगदुम ९१७५९०२८०८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६८५/२०२३,भादविक ३२६,३२४,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-७५ वर्षे,रा.सर्व्हे नं.१४,रामनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/१०/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा.सर्व्हे नं.१४,वार्ड नं.०५,फॅमिली मेडीकल केमीस्ट जवळ,रामनगर,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे परिसरात राहणारा यातील नमुद इसम हा फिर्यादीचे राहते घराचे बाजुस एटीएम जवळ एका अनोळखी इसमास मारहाण करत होता. फिर्यादी यांची सुन हीने सदर इसमास मारु नका असे सांगितल्याचे कारणावरुन,त्याचा राग येवुन त्याने फिर्यादी व त्यांचा मुलगा गोल्डी,वय-४९ वर्षे,सुन यांना शिवीगाळ करून,हॉकी स्टीक व फरशीच्या तुकडयाने फिर्यादी व त्यांचा मुलगा यास मारहाण करुन,गंभीर जखमी केले. तसेच लोखंडी हत्यार स्वतः जवळ बाळगुन,ती हवेत फिरवुन परिसरात लोकांना धमकावुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पाटील ९७६६७६४४७१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ८०६/२०२३,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३४ वर्षे,रा.गावडेवाडी,शिरसवडी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/१०/२०२३ रोजी १९/१० वा.गावडेवाडी,(नागवडेवस्ती),शिरसवडी,ता.हवेली,जि.पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे घरासमोरील अंगणातील ओटयावर बसले असताना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी संगनमत करुन,मोटार सायकलवर येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३५,०००/- रुपये किंमतीचे जबरदस्तीने हिसकावुन,त्यांचे डावे हातावर चाकुने वार करुन,त्यांना गंभीर दुखापत करुन,जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गोडसे ८०८२०७७१०० |

## <u>दि.०७/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २२९/२०२३,भादविक १४१,१४३,१४७,१४९,४२७,म.पो.का.क.३७(१)(३)१३७ |
| **फिर्यादी** | हनुमंत मरे,वय-४० वर्षे,रा.शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे |
| **आरोपीत** | ४ ते ५ अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०२३ रोजी पहाटे ०१/४० वा.शिवाजली मित्र मंडळा समोरील रोडवर शास्त्रीनगर कोथरुड, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे विघ्नंहर्ता नावाचे किराणा मालाचे दुकान राहते घराजवळ असुन,किराणा दुकानासाठी लागणारे सामान आणेकामी त्यांचेकडील चारचाकी गाडी हही त्यांचे घराजवळ पार्क करून ठेवलेली असताना,यातील नमुद इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवुन,फिर्यादी यांचे घरासमोरील स्मशानभुमी रोडवरील पार्क केलेली फिर्यादी यांची कार तसेच इतर साक्षीदार यांची रिक्षा व आजु-बाजुचे २ ते ३ वाहनांचे लाकडी दांडके व दगडाने तोडफोड करून,सदर वाहनांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. तानाजी पांढरे ९३२५६९२०१३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २३०/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७ |
| **फिर्यादी** | गणेश नाकती,वय-४८,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपीत** | उमेश हनुमंत वाघमारे,वय-४८,रा.कुदळे पाटील कॉम्प्लेक्स,माणिकबाग,सिंहगड रोड,पुणे (अटक) व त्याचा साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०२३ रोजी २२/०० वा. ते २२/१५ वा. चे दरम्यान अलका टॉकीज चौका जवळील झेड ब्रीज येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रिक्षा चालक असुन,ते कोथरूड येथुन त्यांचे रिक्षामधुन तीन इसमांचे प्रवासी भाडे घेवुन येत असताना,नमुद ठिकाणी नमुद कार चालकाने त्याचे ताब्यातील कार ही फिर्यादी यांचे रिक्षाचे पुढे असलेल्या दुचाकीस्वार विश्वनाथ रामचंद्रराजे बाहया,वय-६०,रा. ५८३,जलधारा सोसायटी,नारायण पेठ,पुणे यास धडक देवुन,त्यास गंभीर जखमी करून, त्याचे मृत्युस करणीभुत झाला आहे. त्यानंतर फिर्यादी यांचे रिक्षा व पादचारी तसेच इतर वाहनांना धडक देवुन,वाहनांचें चालक व प्रवासी तसेच फिर्यादी यांना दुखापत करून,रोडचे बाजुस असलेल्या विजेचे खांबाला जावुन धडकुन,इतर वाहनांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रियंका निकम ७७४३८२३७२९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**